RNI No. MAHBIL/2009/37831

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-ब

वर्ष ८, अंक १३४]　　शुक्रवार, ऑक्टोबर २१, २०२२/आश्विन २९, शके १९४४　　[पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३८८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### उच्च व तंत्रशिक्षण विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २० ऑक्टोबर २०२२.

**आदेश**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१८५/विशि-३.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा.६) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३ च्या पोट-कलम ६ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, काढलेली शासकीय अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक संकीर्ण/प्र.क्र.२०१९/विशि-३, दिनांक २७ ऑक्टोबर, २०२१ अन्वये, प्रमुख महाविद्यालय म्हणून यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा आणि घटक महाविद्यालय म्हणून, छत्रपती शिवाजी महाविद्यालय, सातारा आणि धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा यांचा समावेश असलेले कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ” असा करण्यात आला आहे) घटित केले आहे, आणि त्यात, त्यांची प्राधिकरणे, अधिकार व कर्तव्ये विनिर्दिष्ट केली आहेत ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला उक्त कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरुची नियुक्ती करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी आता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. ६) याच्या कलम १४४ च्या खंड (क) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा, आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे —

(एक) उक्त कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचा प्रथम कुलगुरु म्हणून शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरु, डॉ. डी. टी. शिर्के यांची, एका वर्षाकरिता किंवा उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या तरतुदींन्वये नियुक्त केलेला कुलगुरु आपले पदग्रहण करेपर्यंत यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत, नियुक्ती करीत आहे ; आणि

(दोन) असे निर्देश देते की, ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून आपले स्वतःचे नियमित अधिकार, कर्तव्ये व कार्ये सांभाळून उक्त कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरु म्हणून, सर्व अधिकारांचा वापर करतील, आणि त्या पदाची सर्व कर्तव्ये व कार्ये पार पाडतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
शासनाचे प्रधान सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated the 20th October 2022.

### *Order*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. MIS-2019/C.R.185/UE-3.— Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Higher and Technical Education Department, No. MIS-2019/C.R.185/UE-3, dated the 27th October 2021, issued in exercise of the powers conferred by sub-section (*6*) of section 3 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017) (hereinafter referred to as "the said Act"), constituted the Karmaveer Bhaurao Patil University, Satara, comprising of the cluster of the Yashavantrao Chavan Institute of Science, Satara as a lead college and Chhatrapati Shivaji College, Satara and Dhananjayrao Gadgil College of Commerce, Satara as constituent Colleges (hereinafter referred to as "said Karmaveer Bhaurao Patil University"); and specified its authorities, powers and functions therein;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to appoint the first Vice-Chancellor of the said Karmaveer Bhaurao Patil University, Satara.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (a) of section 144 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. VI of 2017), and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby,–

(*i*) appoints Dr. D. T. Shirke, Vice-Chancellor of the Shivaji University, Kolhapur, as a first Vice-Chancellor of the said Karmaveer Bhaurao Patil University, Satara, for a period of one year or till the Vice- Chancellor appointed under the provisions of section 11 of the said Act, assumes charge of his Office, whichever is earlier; and

(*ii*) directs that he shall exercise all the powers and perform all the duties and functions as the Vice-Chancellor of the said Karmaveer Bhaurao Patil University, Satara, in addition to his regular powers, duties and functions as the Vice- Chancellor of the Shivaji University, Kolhapur.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

VIKAS CHANDRA RASTOGI,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.